# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 24/02/2020 (सोमवार)
# (दुपार)

---

## विनयभंग

1) पो.स्टे. खापरखेडा :– दि. 23/02/2020 चे 16:30 वा. ते 17.00 वा. चे सुमारास 21 वर्षीय पीडित/फिर्यादी हिला आरोपी नामे– निलेश रामु बरडे, वय 21 वर्ष, रा. बिना संगम वार्ड क्र. 1 याने " माझ्या सोबत बोल असे पीडितेस म्हटले. यानंतर पीडितेने आरोपीस बोलन्यास नकार दिला असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 323, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक निलेश बिजवाडा 8806666469 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– दि. 22/02/2020 चे 14:30 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 17 वर्षीय पीडित मुलगी हि बस स्टॉपला उभी असता आरोपी नामे– आकाश तिरगुळे, रा. सावंगा मध्यप्रदेश याने पिडितेला ''तुझा पेपर कसा गेला'' असे विचारले असता पीडित मुलगी काहीही न बोलता तेथून पुढे जावू लागली तेव्हा आरोपीने पीडितेचा पाठलाग करून "माझ्या सोबत नास्ता करायला चल'' असे म्हटले यावर पीडितेने नकार दिल्याने तुझी बदनामी करील अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार बोरकर हे करीत आहे.

3) पो.स्टे. भिवापुर :– दि. 23/02/2020 चे 16:00 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 21 वर्षीय पीडित मुलगी हि घरातील अंगणात भांडे धुवत असतांना आरोपी नामे– राहुल उर्फ राहुल्या महादेव हुमणे, वय 24 वर्ष, रा. सेलोटी ता. भिवापुर याने पिडितेला एकटी असल्याचे पाहुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला तसेच पीडितेला शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(अ), 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री शरद भसमे 9764946808 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. काटोल :–अंतर्गत 12 कि.मी. सोनोली येथे दिनांक 23/02/2020 चे 19:00 वा. ते 19. 15 वा. दरम्यान एमपी–09/एचएच–3173 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– विष्णु जग्गनाथ मालविय, वय 32 वर्ष, रा. तह. जिरापुर, जि. राजगड (म.प्र) याने त्याच्या ताब्यातील कंटेनर गाडी भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन पायदळ जाणारे गंगाधर रघुनाथ दुपारे, वय 42 वर्ष, सोनोली यांना मागुन धडक दिली. या अपघातात गंगाधर दुपारे हे जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभुदास दलाल 9823970139 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर